# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/12/2023 (बुधवार) सकाळ

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

## वाहनासह एकुण १५,३०,०००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

## पोलीस स्टेशन रामटेकची कारवाई

दिनांक २०/१२/२०२३ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोलीस स्टेशन रामटेक परीसरात पेट्रोलींग करीत असताना अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक होत असल्याची मुखबीरद्वारे मिळालेल्या माहितीवरून एका ट्रकमध्ये विनापरवाना रेतीची वाहतुक होत आहे असे सांगितल्यावरून पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ यांनी रामटेक बसस्थानकाजवळ हायवे रोडजवळ नाकाबंदी केली असता दि. २०/१२/२०२३ ०१.४० वाजता दरम्यान एक ट्रक येतांना दिसला ट्रकला हात दाखवुन थांबण्याचा इशारा केला असता ट्रकच्या चालकाने ट्रक रोडच्या बाजुला थांबविला. सदर ट्रकची पाहणी केली असता ट्रकचा क्रमांक एम. एच. ४० सी. एम. ५७०० व १६ चाके असल्याचे दिसला. चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव इम्रान नाशिर खान वय ३२ वर्षे रा. नुर नगर गली नं. २, वलगाव रोड, अमरावती असे सांगितले. त्यास वाहनाच्या मागील डाल्यात काय आहे? असे विचारले असता त्याने रेती (वाळु) असल्याचे सांगितले, त्यास रेती वाहतुकीबाबत परवाना विचारले असता त्याने परवाना नाही असे सांगितले. सदर ट्रक क्रमांक एम. एच. ४०/सी. एम. ५७०० किंमती १५,००,०००/—रू. व अंदाजे १० ब्रास रेती ३०००/— रू. प्रती ब्रास प्रमाणे ३०,०००/—रू. असा एकण— १५,३०,०००/— रु. चा मुद्देमाल अवैधरित्या वाहतुक करतांना चालकाच्या ताब्यात मिळून आले. सदर मालाबाबत इम्रान नाशिर खान यास विचारपुस केली असता वाहन मालक नामे— युनुस इलियास खान, रा. यास्मीन नगर अमरावती यांचे सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याचे सांगितले. सदर रेती ही बफेरा, बालाघाट (मध्यप्रदेश) येथून भरली असून रामटेक—नागपुर मार्ग अमरावती येथे अवैधरीत्या विनापरवाना घेऊन जात असल्याचे त्याने सांगितले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोलीस नायक प्रफुल मुरलीधर रंघई, पोलीस ठाणे रामटेक यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे सदर ट्रकचे चालक नामे १) इम्रान नसीर खान, राहणार अमरावती यांचे विरूद्ध कलम ३७९ भा. दं. वि. १८६० सहकलम ४८ (८) महा. जमीन महसूल संहीता १९६६ अन्वये गुन्हा दाखल असुन ट्रक मालक आरोपी क्र. ०२) यांचेविरूद्ध कलम १०९ भादंवि अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.

सदर कारवाई मा. श्री. हर्ष ए. पोद्दार पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, श्री. डॉ. संदिप पखाले अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन रामटेक येथील ठाणेदार हृदयनारायण यादव, पोलीस उपनिरीक्षक कार्तिक सोनटक्के, पोलीस नायक प्रफुल रंधई, योगेश भुरे, पो. शि. नितेश डोकरीमारे, शरद गिते यांच्यासह पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर